८५१२७
०८/०३/२०२३

**माहितीचा अधिकार अधिनियम**
**2005**
**अ परिशिष्ट**

प्रति,
मा. माहिती अधिकारी
मा. कार्यालय अधिक्षक
मा.सहायक के/ पूर्व विभाग
पालिका ...
मुंबई - ४०००६९

१)अर्जदाराचे नाव:- मनिषा किसन धिंडे 9769312294
२)अर्जदाराचा पूर्ण पत्ता : सीपीडी संस्था कार्यालय ,१/२ शिववैभव सोसायटी,मजास टेकडी रोड, जोगेश्वरी (पूर्व)मुंबई 400060
३)आवश्यक माहितीचा तपशील:
**(अ) माहितीचा विषय:** वन हक्क कायद्यातील तरतुदीनुसार महापालिका क्षेत्रातील वॉर्डस्तरीय समिती बाबत..
**(क) आवश्यक माहितीचे वर्णन:**

भारत सरकार,जन जाती कार्य मंत्रालय दिनांक 5 /3 /2015 या शासन निर्णया अन्वये नागरी/ नगरपालिकांच्या क्षेत्रात देखील वन हक्क कायदा लागू असल्या बाबतचे निर्देश आहेत. तसेच, वन हक्क कायद्याच्या अंमलबजावणी बाबत (बृहन्मुंबई महानगरपालिका) कार्यक्षेत्रात कार्यवाही बाबत शासन निर्णय क्रमांक व.ह.का.- 2015 प्र.क्र. 61/कार्यासन -14 दिनांक 8/9/2015 आदिवासी विकास विभाग,महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 3.1 नुसार नियुक्त वॉर्ड समिती बाबत खालील माहितीचे कागद पत्रे मिळावेत.

1) वन हक्क कायदा अन्वये वन हक्क दावे मंजुरी बाबत नियुक्त वॉर्ड समितीतील नियुक्त सदस्यांची संपूर्ण यादी मिळावी.
2)महापालिका क्षेत्रातील वॉर्ड समिती स्थापित दिनांका पासून ते आज पर्यंत आयोजिलेल्या बैठकांचे इतिवृत्ता चे कागदपत्र मिळावेत.
3) या वॉर्ड समिती मध्ये स्थानिक आदिवासी रहिवाशांतर्फे वन हक्क दावे मंजूरी बाबत प्राप्त अर्ज आणि या अर्जांवरील प्रशासकीय मान्यतेचे मंजुरी बाबतचे कागदपत्र मिळावेत.

**क) माहिती टपाल्याने की स्वत: घेणार?** :- स्वत:
**ड) माहिती टपालाने आवश्यक असल्यास कोणत्या टपालाने? :-** लागू नाही
**४) अर्जदार दारिद्र रेषेखालील आहे का? :-** होय
(सोबत बीपीएल असल्याचे झेरॉक्स जोडत आहे)

**ठिकाण :- जोगेश्वरी, मुंबई** दिनांक ८/०३/२०२३

**अर्जदाराची सही.**
M. K. Dhinde
**मनीषा धिंडे**

प्रो. शिंदे
नागरसंविद विभागास
वर्ग करा
९.३.२०२३

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## प्रभाग समिती कार्यालय क्र.१
शुभम् आर्केड, दुसरा मजला, मिरा हॉस्पीटलच्या शेजारी, डी मार्ट परिसर,
भाईंदर (पश्चिम) ता.जि.ठाणे ४०१ १०१ दुरध्वनी क्र. २८१४०००२


जा.क्र.मनपा/प्र.का.क्र.१/ २८०८/ २०२२-२३ दिनांक :- ०८ /०३ /२०२३

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
आवक क्र. ...०१० ...
दिनांक :- ०८/ ०३/२०२३

प्रति,
मा.विभागप्रमुख
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- "केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम २००५" अन्वये.

संदर्भ :- श्री. मनिष किसन धिंडे यांचे दि. ०८/०३/२०२३ रोजीचे माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये श्री. मनिष किसन धिंडे यांनी अर्जात नमूद केलेला विषय हा आपल्या विभागाशी निगडीत असल्याने सदरचे पत्र आपले कडे वर्ग करण्यात येत असून अर्जदारास आपले स्तरावर परस्पर माहिती देण्यात यावी.

सोबत :- माहिती अधिकारातील अर्ज

९.३.२०२३
(कांचन गायकवाड)
जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त
प्रभाग समिती कार्यालय क्र.१
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव:-
श्री. मनिष किसन धिंडे
सीपीडी संस्था कार्यालय, १/२,
शिववैभव सोसायटी,
मजास टेकडी रोड,
जोगेश्वरी पूर्व-४०००६०

016

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
सचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./०८ /2023 दिनांक :- २३/०३/2023

प्रति,
जनमाहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त,
प्रभाग समिती कार्यालय क्र. 1,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.

संदर्भ :- 1) आपणांकडील दि. 09/03/2023 रोजीचे पत्र.
2) सोबत :- श्री मनिष किसन धिंडे यांचे दि. 08/03/2023 रोजीचा माहिती अधिकार नियमांतर्गत अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्र 1 अन्वये आपण श्री मनिष किसन धिंडे यांचे संदर्भित 02 चे पत्र या कार्यालयाकडे अर्जदार यांना परस्पर माहिती देणेसाठी वर्ग केलेले आहे.

श्री मनिष किसन धिंडे यांचेकडील संदर्भित पत्र 02 चे अवलोकन केले असता त्यांनी वन हक्क कायद्यातील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्डस्तरीय समितीबाबत माहितीची मागणी केलेली आहे.

आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी मागितलेली माहिती सचिव विभागाशी निगडीत नाही. प्रभाग समिती सभांचे संपूर्ण कामकाज प्रभाग अधिकारी यांचेमार्फत चालविण्यात येते. तसेच प्रभाग समिती सभांचा संपूर्ण अभिलेख देखील प्रभाग कार्यालयांच्या ताब्यात आहे. करिता संदर्भित पत्र 02 ची मुळप्रत पुन:श्च आपणांकडे वर्ग करण्यात येत आहे. तरी अर्जदारांस आपल्या स्तरावर परस्पर माहिती द्यावी हि विनंती.

कळावे.

(कैलास दा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
श्री मनिष किसन धिंडे,
सीपीडी संस्था कार्यालय,
½ शिववैभव सोसायटी,
मजास टेकडी रोड, जोगेश्वरी (पूर्व)
मुंबई - 4000060.

पोच. २८/३/२३
आवक लिपीक
प्रभाग समिती क्र. १
मिरा भाईंदर महानगरपालिका

EM012434574IN IVR:6977012434574
SP BHAYANDER WEST S.O (401101)
Counter No:1,24/03/2023,10:52
To:MANISHA..
PIN:400060, Jogeshwari East SO
From:MIRA BHY..
Wt:20gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>
<Dial 18002666868> <Wear Masks>

pc 2U:\01 Pranali\Mahiti Adhikar\Letter - Kanchan Gaykavad.docx

दि. २४/३/२०२३ रोजी श्री. मनिषा किसन धिंडे यांस स्पीड पोस्टाने सदरचे पत्र पाठविण्यात आले.